# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ३४ /२०२४

**विषय : पीएच्.डी. प्रबंध मूल्यामापन/मौखिक परीक्षा उपस्थित बाह्य परिक्षक, अध्यक्ष, संशोधक मार्गदर्शक, सह मार्गदर्शक यांचे देयके ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणेबाबत...**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्रे/परिसंस्था यांना कळविण्यात येते की, सद्यस्थितीत पीएच्.डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा पार पडल्यानंतर संबंधितची देयके या कार्यालयात जमा करतात व त्यावर ऑफलाईन पद्धतीने कार्यवाही केली जाते. या प्रक्रियेमध्ये प्रबंध मूल्यमापन व मौखिक परीक्षेकरिता उपस्थित अध्यक्ष, मार्गदर्शक, सहमार्गदर्शक, बहि:स्थ परिक्षक यांची देयके अदा करण्यास विलंब होतो, याबाबत मार्गदर्शक/बहि:स्थ परिक्षकांच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या.

ही सर्व प्रक्रिया सुलभ व जलद होण्यासाठी व संबंधितांना तातडीने देयक अदा करण्यासाठी यापुढे ऑनलाईन पद्धतीने देयके अदा करण्याबाबतची कार्यवाही या कार्यालयाकडून सुरू करण्यात आली असून यापुढे पीएच्.डी. प्रबंध मूल्यामापन/मौखिक परीक्षा उपस्थित बाह्य परिक्षक, अध्यक्ष, संशोधन मार्गदर्शक, सह मार्गदर्शक यांची देयके या कार्यालयाकडे हार्डकॉपीच्या स्वरूपात जमा करण्याची आवश्यकता नाही.

सबब, बाह्य परिक्षक ज्यावेळी त्यांचा प्रबंध मूल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने जमा करतील तेव्हा त्यांना बँकेचा अचूक तपशील भरणे अनिवार्य असेल, त्याशिवाय या कार्यालयाकडून देयके अदा करता येणार नाहीत. तसेच अध्यक्ष, संशोधक मार्गदर्शक, सह मार्गदर्शक हे प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असल्याने त्यांच्या Teacher Profile मध्ये त्यांचा बँकेचा जो तपशील उपलब्ध आहे त्यावर देयक अदा करण्यात येईल, याबाबतची नोंद घ्यावी.

कळावे,

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/६०१ )
दिनांक : २१/०२/२०२४ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यायाबाबत अवगत करावे.

D:\General Circulars\Bills Circular.docx